**Registered with RNI** **BHAVMALA**

MAHABIL 06842/2013 Year-5, Issue-19, - Oct.-Nov.-Dec.-2018



Printed Book/Periodicals
Book-Pocket

प्रति,
श्री./श्रीमती प्रा. डॉ. सुनंदा रेवले मॅडम,
पुंडलिकबाबा महाविद्यालय,
नांदुरा रेल्वे
जि. बुलढाणा

If Underiverd return to :

प्रेषक :-
प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे
संपादक, भावमाला
ग्रीन पार्क-१, श्रीरामपूर,
पुसद, जि. यवतमाळ (महा.) ४४५२१५

पेज नं. 11 ते 12

www.bhavmala.com ISSN2395-0366

# भावमाला

वर्ष-५ वे, अंक-१९, ऑक्टोंबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१८

74

• संपादक - प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे •



## दिवाळी विशेषांक

# अंतरंग


- **शोध निबंध-**
  - १) संत साहित्यातील भक्तीरस – डॉ. शिवप्रसाद वायाळ
  - २) मराठी संतांचे सामाजिक कार्य – डॉ. श्याम जाधव
  - ३) संतांचे कार्य – डॉ. सुनंदा रेवसे
  - ४) संत साहित्यातील उपेक्षितांचा प्रतिनिधी 'चोखामेळा' – डॉ. प्रल्हाद वावरे
- **परिक्षणे -**
  - १) 'दंगल आणि इतर कविता' चिंतनशील मनाचा परिवर्तनवादी आविष्कार – पंडित कांबळे
  - २) काळीजकळा जपणारी संवेदनशील कविता 'वनहरिणी' – प्रशांत ढोले
  - ३) बालकांना आणि पालकांना भावणारे अशोक लोटणकरांचे बालसाहित्य – प्रा. महेश मोरे
  - ४) 'आई, भूक आणि इतर कविता'-वेदनांचा आविष्कार – डॉ. प्रल्हाद वावरे
- **कथा -**
  - १) आतला दंश – डॉ. विजय जाधव
  - २) भूक – संतोषकुमार उईके
- **कविता -**
  - १) डिजिटल इंडिया – शीलवंत वाढवे
  - २) तेव्हा – केशव वसेकर
  - ३) पान्हा फुटू दे – अय्युब पठाण लोहगावकर
  - ४) या पाखरांनो परत या – प्रा. अशोक सारडा
  - ५) देहभार – शांताराम हिवराळे
  - ६) मनाचे विचार – राजेश चौरपगार
  - ७) कईता – माणिक राऊत
  - ८) दगडाच्या डोयातून झरतो पाऊस – मधुकर तरोळे
  - ९) मी माझी – डॉ. लताताई थोरात
  - १०) ती आहे म्हणून – प्रा. सुनिल तोरणे
  - ११) शोध – संध्या पाथरे
  - १२) सुख – प्रशांत ढोले
  - १३) अशी असावी कविता – बाबू फिलिप डिसोजा
  - १४) लेखणी शोधत राहते – गणेश मरकड



हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मतांशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.




# संपादकीय....

मित्रांनो,

या दिपावली निमित्य सर्वांचे अभिनंदन ...... !

त्रैमासिक भावमालाचा हा पाचव्या वर्षातील तीसरा अंक म्हणजे १९वा अंक आपले हाती देतांना अत्यानंद होत आहे, या अंकामध्ये संतसाहित्याला समाजापर्यंत नेण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. विचारपीठ म्हणून जेव्हा एखादी चळवळ मुळ धरू पाहतेय तेव्हा वैचारिक आदान प्रदान होणे अत्यावश्यक असते, जीवनातील विविध समस्यांचा विचार करतांना आज असे दिसते की, फ्लॅश मारणारांची संख्या वाढली आहे, प्रत्यक्ष कार्य न करता स्वत:च्या फायद्यासाठी कोणत्याही चळवळीचा कसा उपयोग करून घेता येईल याकडे कल वाढलेला दिसतोय....देशपातळीवर सुद्धा याचे परिणाम दिसू लागलेले आहेत, साहित्यातून मानवी संवर्धन व्हावं, नव्या जाणीवा वृद्धींगत व्हाव्यात हा कोणत्याही चळवळीचा मुख्य उद्देश असावा परंतु आज स्वार्थाने बरबरटलेली प्रवृत्ती तद्वतच जातीवाद-धर्मवादाने पछाडलेली माणसे अवतीभवती आहेत हे खेदाने नमुद करावे लागते. याचा पावलोपावली अनुभव घेतो आहे, विचारमंचावरून फारच सकारात्मकतेचा आव आणणारी मंडळी वास्तवात किती नकारात्मक आणि तकलादू, खोटारडी, चळवळी नेस्तनाबूत करणारी व्यवस्था निर्माण करताहेत याचा प्रत्यक्ष अनुभव येत आहे.साहित्य चळवळीत विचारवंत म्हणून मिरवणारे, विद्यापीठीय राजकारणात फायद्यासाठी सक्रीय असणारी माणसं पेरलेली आहेत, मग तीच ती माणसं आपल्या विशिष्ट कंपूसाठी काम करतांना दिसतात त्यांना ना साहित्याचं काही घेणं देणं आहे ना समाजाचं काही घेणं देणं, लाजशरम सोडलेली माणसं विविध प्राधिकरणांवर येतात तेव्हा नको त्या गोष्टींची मागणी करतात अशा तकलादू विचावंताकडून आम्ही काय अपेक्षा करावी? हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे. भावमाला शब्द चळवळ ही मानवतेचं निशान फडकविण्यासाठी कार्य करीत आहे. या विचारमंथनातून सर्व सामान्य माणसाच्या उत्थानाचं कार्य व्हावं ही रास्त अपेक्षा ठेवून कार्य करते आहे. यासाठी कुणाच्या पुरस्काराची, मदतीची गरज नाहीच असे मला वाटते. मित्रांनो, या अंकांत संत चळवळीपासून तर आजवरच्या डिजिटल इंडिया पर्यंतच्या सर्व जीवन वादी विचारांना मन:पूर्वक स्थान दिले आहे. या आणि इतरही अंकांसाठी योगदान देणारे माझे सामान्य साहित्यिक मित्र आवर्जून मदत करतात याचा मला मनस्वी आनंद वाटतो. या साहित्य जत्रेमध्ये माझे सर्व मित्र आपले जीवनवादी विचार आपल्या तोडक्या मोडक्या भाषेत विषद करतात याचा मला रास्त अभिमान वाटतो.आणि हेच इथल्या स्वयंघोषित विद्वानांना खटकते कारण ते आकाशातून पडलेले आहेत त्यामुळे सामान्य माणसांचे विचार त्यांना कसे पटणार? न पटोत पण... भावमालेवर नितांत प्रेम करणारे माझे सर्व मित्र माझी प्रेरणा आहेत, प्रोत्साहन आहे असं मला वाटते आणि हेच भावमालेची यशोगाथा आहे अस मी समजतो.शेवटी या शब्दसमराने आपल्याला समाजासमोर व्यक्त होता येतं हा अत्यंत महत्वाचा भाग आहे या अंकांत आलेले विचार आपणास नक्कीच आवडतील अशी अपेक्षा करतो.

आपले पुनच्च मनस्वी आभार मानतो....धन्यवाद...

– प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे,
संपादक, भावमाला

# संतांचे कार्य....

-प्रा. डॉ. सुनंदा रेवसे

मराठीच्या वाङ:मय प्रासादातील संत वाङ्:मय हे एक भव्य आणि नित्यनुतन व चिररूचिर असे दालन आहे. यातून आर्तता, ज्ञानाचे हुंकार, संस्कृतीचा सुगंध आणि भाषेचा विलास आजपर्यंत मराठी वाङ्.मयाला लाभत आला आहे. संतांनी आत्मोद्धाराची तळमळ, देश महाराष्ट्रीय संतांनी स्वकालीन परिस्थिती लक्षात घेवून सर्वसामान्य जनतेला आपल्या समाजाच्या संस्कृतीचा परिचय करून दिला आणि त्यांना आत्मोद्धाराचा रस्ता दाखविला.

शके १२१२ ते १६०० हा संतकवींचा काळ समजला जातो. या काळात महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास हे प्रमुख संतकवी अन् विसोबा खेचर, सावता माळी, गोरा कुंभार, जनाबाई, मुक्ताबाई, चोखामेळा, नरहरी सोनार, सेना न्हावी इ. लहान मोठे कवी होवून गेले. हे कवी केवळ साधू वृत्तीने राहत होते व वागत होते म्हणून त्यांच्या जीवनात परमार्थाचा गाभा प्राप्त झाला होता. त्यांनी काव्यरचनेसाठी आपली काव्यदृष्टी उभारली नसून परमेश्वर प्राप्तीचा सुलभ मार्ग शोधला होता. भक्तीचा डांगोरा त्यांनी स्व-उद्धारार्थ व जनहितार्थ पिटायचा होता. त्यामुळे 'भक्ती' हा त्यांचा स्थाईभाव झाला आहे. परमात्म्याची वेगवेगळी रूपे व त्यास प्राप्त करतांना येणारे निरनिराळे अनुभव हेच अस्सल अनुभव आहेत. त्यात एकरूपता आढळते. हे संत प्रथम भक्त आणि नंतर कवी असल्याने त्यांचे काव्य चमत्कृती आणि अलंकारशास्त्राने नटलेले नसले तरीआत्म निवेदनाच्या तळमळीतून उतरलेले एक सरस भावकाव्य आहे. त्यात भावनांचा उद्रेक आहे. तशीच भावाभिव्यक्तीची स्वयंपूर्णता आहे. त्यांनी हा एकच विषय आशयाने हाताळला असला तरी अभिव्यक्तीची पद्धती आज प्रत्येक कवीची स्वतंत्र आहे.

आगळी वेगळी आहे. त्यामुळे ते चिरनुतन आहे.

संतांच्या कामगीरीचा विचार करत असतांना तत्कालीन सामाजिक परिस्थिती विचारात घ्यावी लागेल यादवकाळ जसा भरभराटीचा काळ असला तरी या काळात व्रतवैकल्यांचे प्राबल्य हे माजलेच होते. दर दिवसाला व दर तिथीला पाच दहा व्रते



ISSN2395-0366

सांगणारा हेमाद्रीपंडीताचा 'चतुर्वर्ग चिंतामणी' नावाचा ग्रंथ अस्तित्वात होता या व्रतखंडावरून वर्षाकाठी हजार व्रतांची कल्पना येते. त्याकाळात अशा सुस्थितीमुळे स्वाभाविकच कर्मकांड व कर्मविकाप असल्या फडतूस गोष्टींना भरते आले होते. परिणामी हिंदू धर्मीयांच्या ऱ्हासासही प्रारंभ होवू लागला होता. प्रचलित समाजव्यवस्थेमधील धर्माच्या नावाखाली चाललेला ढोंगीपणा ज्ञानदेवांना असह्य झाला व भागवत धर्माचा पाया रचला गेला तो ज्ञानेश्वरीच्या रूपाने.

स्वानुभावाने ज्ञानेश्वर ते तुकाराम आणि इकडे वैराग्यमुर्ती गाडगेबाबा, संत गुलाबराव महाराज, वं. राष्टसंत तुकडोजी महाराज यांनी समाजाकडे पाहिले. तेव्हा त्यांना जिकडे तिकडे पसरलेली सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक असमानता दिसली. धर्माचे स्वरूप विकृत झाले होते. तेव्हा हे संत खरे लोकशिक्षक बनले. त्यांनी आपल्या विचार उच्चार व आचरणाद्वारे समाजाला वेळोवेळी हितोपदेश केला. त्यांचा हा हितोपदेश चिरकाल प्रभावी ठरला. त्याची व्याप्ती केवळ महाराष्ट्रापुरतीच मर्यादित राहिली नसून त्यात समग्र संसारातील अखिल मानवजातीच्या हितासाठी अंतिम मूल्यांचा शोध आहे.

'आधी केले । मग सांगीतले ।' किंवा 'बोले तैसा चाले'

या तत्वज्ञानुसार संतांनी स्वतःच्या आचरणाद्वारे समाजापुढे आदर्श ठेवला आहे. संत ज्ञानेश्वरांनी स्वतःचा संसार केला नसला तरी 'अवधाचि संसार । सुखाचा करीन ।' असा विश्वाचा संसार केला. या विश्वाचा संसार सुखी होण्यासाठी त्यांनी विश्वात्मक आदिपुरूषाला 'जो जे वांछिल, तो ते लाहो । प्राणीजात ।।'असे म्हटले आहे. हे सर्व संत केवळ सामान्याविषयी कळवळाच बाळगणारे नव्हते तर ते स्वतःच विपन्नावस्थेतून पुढे आल्याने त्यांची सहानुभूती अतिशय प्रखरअशी होती. वैश्विकतेच्या कल्पनेचा पुरस्कार करून त्यांनी अद्वैताचे विवेचन परिपूर्ण केले. त्यामुळे या संताच्या ऐहिक जीवनाला अध्यात्माची बैठक प्राप्त झाली होती. यातील काही संत प्रपंच नेटका करायला सांगतात.

ग्यानबा तुकारामाच्या जल्लोषात मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, सोयराबाई इ. अनेक संत महिला ही होत्या पण या जल्लोषात त्यांचा आवाज कुठे लुप्त झाला? म्हणून त्यांचा अधिकार कुणी हिरावून घेऊ शकत नाही. एकट्या मुक्ताबाईनेच तर संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चांगदेवाचे गुरूत्व पार पाडले आहे. खरच



ISSN2395-0366

'मुक्ताबाईचे चित्त । निरंतर मुक्त होते ।' हा अभंग तिचे श्रेष्ठत्व सिद्ध करतो. निवृत्तीनाथांचे वैराग्य, ज्ञानेश्वरांची तेजस्विता व नामदेवांची चिंतनशीलता हे गुण मुक्ता बाईच्या अंगी होते. हे गुण एकत्र आल्यामुळे मुक्ताबाईचे व्यक्तिमत्व मोठे दाहक झाले होते. स्त्रिच्या अधिकारक्षेत्रामध्ये वयाची आडकाठी येवू शकत नाही याचा उत्कृष्ट नमुना म्हणजे संत मुक्ताबाई होय.

संतांनी अ) वेदांत व व्यवहार ब) एकाग्रता व चतुरस्त्रता क) आत्मनिष्ठा व लोकसंग्रह ड) नि:स्पृहता व चातुर्य इ) प्रपंच व परमार्थ यांची उत्तम सांगड घालून समाजाला सन्मार्गाकडे वळविले. संतांच्या याच संदेशातून लोकांना जीवन सुखी व समृद्ध करण्याचा मार्ग गवसला. अशाप्रकारे संतांनी संसाराची अवहेलना करण्यास सांगीतले नसून उत्तम संसार कसा करावा हे वारंवार सांगीतले आहे. त्यांनी समाजाला विचार प्रवण व कार्यप्रवृत्त केले. केले. व्यक्तीचा विकास व समाजाचे कल्याण करण्यास आवश्यक असलेल्या भक्ती, ज्ञान, वैराग्य, दया, क्षमा, शांती इ. गुणांचा त्यांनी वेळोवेळी पुरस्कार केला. या दृष्टीने संतांचे सामाजिक कार्य बहुमोलाचे ठरत असून त्यांची भूमिका ही समाजशिक्षकाची होती याची खात्री पटते.

– प्रा.डॉ. सुनंदा रेवसे,
नांदूरा रेल्वे
संवाद-९४२१७४६९७५

आमच्या भावमाला परिवारातर्फे
सर्व आचार्य (पीएच. डी.) प्राप्त मित्रांचे
हार्दिक अभिनंदन....!



१) डॉ. कैलास वानखडे, अकोला
२) डॉ. वर्षा गणगणे-धावडे, वणी यवतमाळ
३) डॉ. सुनिल वाशिमकर, पुसद, यवतमाळ



# संतसाहित्यातील उपेक्षितांचा प्रतिनिधी : 'चोखामेळा'

-प्रा.डॉ. प्रल्हाद वाव

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, संत म्हणजे सज्जन. गेल्या एक हजार वर्षा समृद्ध परंपरा संतसाहित्याला आहे. संत चळवळ ही खरंतर महाराष्ट्राचाच नव्हे तर देशाचं वैभव आहे असं म्हणावं लागतं. त्याचं कारण संतांनी सामान्य माणसाच्या अस्मितेचा हुंकार घेतला होता. संतांच फार मोठं योगदान येथील भाषा आणि संस्कृतीला आहे. समाजात समतेचं तत्व रूजविण्याचं महान कार्य संत चळवळीने केलेले आहे. त्याकाळी समाजामध्ये असलेल्या विविध चुकीच्या समजुतीमध्ये सर्व सामान्य माणूस होरपळून गेलेला होता तर दुसरीकडे संत ज्ञानेश्वरांनी 'माझ्या मराठीची बोलू कौतुके । परि अमृतातेही पैजा जिंके ।।' असा एक वसा घेवून या चळवळीने महाराष्ट्राच्या सांस्कृतीक चळवळीला मोठे बळ दिले दिले. सर्वसामान्य माणसांच्या मनोभूमिकेला समृद्ध करून अध्यात्माचा वसा घेवून माणसाला जागविण्याचे महान कार्य संतांनी केलेले दिसते. सर्व बहुजन समाजाला एकत्र आणण्याचा महत् प्रयत्न त्या काळी संतांनी कसोशीने केल्याचे दिसते.संतांचा महान जीवनवादी विचार खरे तर मानवतेला जागविणाराच होता. म्हणूनच समाजातील सर्व घटकांना एकत्र घेवून त्यांचे कार्य सदोदित सुरू होते. त्यातूनच उपेक्षितांना सुद्धा बळ प्राप्त झाले होते.

आपल्या जीवनपद्धतीला उचनिचतेचे भयंकर असे वातावरण निर्माण झालेले होते आमच्या बहुजनसमाजातील सर्व मंडळींना एकत्र आणतांना माळी, कोळी, तांबोली, कुंभार, चांभार, अशा सर्वच जातींमधील संत-महात्म्यांना सोबत घेवून एक समरसता चळवळ उभी केली. त्याचा सकारात्मक विचार समाजापुढे ठेवला. पंढरपुरच्या विठोबाला आपले दैवत माणून त्यांना समाजातील सर्व उपेक्षितांना भागवत धर्म व वारकरी संप्रदायाच्या एका झेंड्याखाली आणले त्यातूनच आपले स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी महान कार्य केले. मराठी संत परंपरा आणि गावगाडा अलग करताच येणार नाही एवढा एकजिनसी पणा यात दिसून येतो अर्थात त्या काळाची ती आवश्यकताच होती, गरज होती. संतांनी आपल्या विठ्ठलाला साक्षी ठेवून गावगाड्यातले आपले जगणे सजीव केले. त्यांनी पंढरीच्या आपल्या दैवताला आपले दुःख सांगीतले पण दुःखाचे भोग मात्र आपण आपले भोगले. ज्ञाना, नामा, तुका, सावता सेना, गोरा, चोखा ही संतमंडळी आपल्या अभंगातून विठ्ठलाला आपले दुःख सांगत होती. थोडक्यात कष्टकरी आणि कामकरी माणसांच्या वेदनांना उजागर करण्याचे संतांचे कार्य मात्र खरोखर महान होते.

महाराष्ट्रामध्ये तेराव्या शतकात पारमार्थिक लोकशाहीची चळवळ, क्रांती प्रथमच



ISSN2395-0366